ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 12 | AUG - 2020

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# कालिदासाच्या मेघदूतात निसर्ग व मानवी व्यवहार



**प्रा. प्रमिला एस. बोरकर**
**सहा. प्राध्यापक (संस्कृत) व विभाग प्रमुख,**
**राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला.**

महाकवी कालिदास विरचित मेघदूत विश्व साहित्य मध्ये सर्वक्षेष्ठ मधुर गीतिकाव्य मानले जाते. महाकवी कालिदासाची अमर रचना म्हणजे मेघदूत होय. जे मंदाक्रांता छंदांमध्ये लिहिलेले आहे कवीच्या लोकप्रियतेचा सर्वात ज्वलंत व सुदृढ मेघदूत आहे. मेघदूत म्हणजे यक्षाच्या प्रेमविरहाची कथा एकूण ११० श्लोकांमध्ये रेखाटलेली आहे. यक्षाला दिलेले एक वर्षाची शिक्षा म्हणजे रामगिरी पर्वतातवर निवास. यक्ष प्राकृतिक सौंदर्याने नटलेल्या रामगिरी नावाच्या पर्वतावर आपला विरहाचे दिवश व्यतीत करीत असता आषाढाच्या पहिल्या दिवशी पर्वताच्या शिखराला अलिंगन देणाऱ्या,वप्रक्रिडा करणाऱ्या हत्तीप्रमाणे सुंदर दिसणाऱ्या मेघाला पाहतो. श्रावण महिना जवळ असताना पत्नीच्या जीवनाला आधार देण्याची इच्छा कराणारा मेघा द्वारा स्वतःची कुशलता कळविण्याची इच्छा करणारा नुकत्याच उगवलेल्या कुटज पुष्पांनी त्या मेघाचे स्वागत करतो आणि म्हणतो हे मेघा तू संतप्त झालेल्या लोकांचे उच्च कुळातील आश्रयस्थान आहेस. तेव्हा कुबेराच्या क्रोधामुळे पत्नीपासून वियुक्त झालेला माझा संदेश माझ्या प्रेयसीला पोहचव विरहाचे चार महिने बाकी आहे. शंकराच्या डोक्यावरील चंद्राच्या प्रकाशाने उजळुन झालेले राजवाडे असलेल्या श्रेष्ठ अशा यक्ष लोकांच्या अलका नावाच्या नगरीत तुला जायचे आहे.

मेघाला प्रवासाचा मार्ग सांगताना यक्ष म्हणतो, अनुकुल वारा तुझ्या इच्छेनुरूप तुला पुढे पुढे नेईल तुला गर्विष्ठ चातक पक्षी तुझ्या डाव्या बाजुला मधूर असा आवाज करतील. आकाशातील बलाका संपुर्ण मार्गात तुझी सेवा करतील. कैलास पर्वतापर्यंत जाण्यास सोबतीला राहतील. मानससरोवराकडे जाण्याकरीता उत्सुक असलेले राजहंस आकाशात तुला कैलास पर्वतापर्यंत सोबत करतील. पुढे यक्ष मेघाला सांगतो उंच रामगिरी पर्वताला आलिंगन घेऊन त्याचा निरोप घेत नंतर परिश्रमाने थकलेला मार्गात बरोबर तू पर्वतावर पाऊल ठेवून वर्षाव केल्यामुळे कृश झालेल्या झऱ्याचे हलके पाणी पिऊन पुढे जाशील. प्रवास करतांना थकला असता पर्वताच्या शिखरावर विसावा घेशील. आम्रकूट पर्वत तुझे अतिथ्य करणार उपकार म्हणून त्याची दावग्नि शांत केल्यामुळे तुला डोक्यावर धारण करणार आजबाजुला पायथ्यापासून शिखरापर्यंत पिकलेल्या आंब्यांच्या वनाने भरलेला आम्रकूट ज्याच्या शिखरावर कृष्णवर्णीय मेघ बसला असता मेघदुताच्या कवीला पृथ्वीरुपी नायीकेच्या स्तनाप्रमाणे दृष्टीस पडतो आम्रकूट पर्वत केसाच्या वेणी प्रमाणे चटकदार काळ रंग असलेला तू शिखरावर आरुढ झाला असताना मध्ये शाम वर्ण व उरलेला भाग पिवळसर असलेल्या पृथ्वीच्या स्तनाप्रमाणे देवांच्या जोड्यांनी पाहण्याला योग्य अशा स्थितीला निश्चितच जाशील. विंध्य पर्वताचया पायथ्याशी पसरलेली रेवा नदी हत्तीच्या अंगावर रेषांनी काढलेल्या वेलबुट्टी प्रमाणे पाहायला मिळेल. विंध्य पर्वत व रेवा नदी यांच्यावर नायक-नायिकेचे वर्णन केले आहे. मेघा तू वर्षाव केलेला सुगंधी मदाने सुवासित जांभळाच्या कुंजाने मंदावलेली गती असलेल्या नर्मदेचे पाणी पिऊन पुढे जा. हरिण कर्दळीचया कळयांना खाऊस अरण्यात अतिशय सुगंधीत असा पृथ्वीचा वास घेऊन थोड्या - थोड्या पाण्याचा वर्षाव करणाऱ्या तुला मार्ग सुचित करतील. कुटजाचे फुलांनी सुगंधीत अशा प्रत्येक पर्वतावर वेळ जाईलच तसेच केकारव स्वागताचे वचन करून मोरांकडून तुझे स्वागत केल्या गेलेल्या तेव्हा तू शिघ्र जाण्यास उद्युक्त होशील. दशार्न प्रदेशाचे वर्णन करतांना सांगतो. की केतकीच्या फुलांनी उपवनाचे कुंपन पांढुरके असलेले पक्षांच्या घरट्यांनी गजबजलेले गावातील वृक्ष हंसाचे निवासस्थान होतील. दशार्न देशातील राजधानीला लावून ताबडतोब विलासी वृत्तीचे संपूर्ण फळ प्राप्त करशील. कारण चंचल लाटा असलेल्या वेत्रवतीचे स्वादिष्ट पाणी भुवयांचे विलास असलेल्या नायीकेच्या मुखाप्रमाणे किनाऱ्यावर मधुर गर्जना करीत प्राशन करशील. इथे मेघ वेत्रवती वर नायक-नायिकेच्या व्यवहाराचे प्रतिपादन केलेला आहे. महाकवी कालिदासाने अचेतन सृष्टीतही शृंगार खेळवला आहे.

मार्ग जरी वाकडा असला तरी उज्जैनीला जा. शहरी चंचल नजरेच्या स्त्रीयांना बघितल नाहीस तर तू फार मोठया सुखास पारखा होशील असेही मेघाला सांगातो प्रसिध्द राजधानी उज्जैनी येथे प्रसिध्द मंदिर आहे. या उज्जैनीलाच अवंती असेही म्हणतात येणाऱ्या सात नगरांमध्ये हिचा समावेश आहे. निर्विंध्या नदीच्या जवळ जाऊन तिच्या आत प्रवेश कर तुझे प्रतिबिंब तिच्या पाण्यात पडू दे स्त्रियांचे प्रियकारांच्या बाबतीत शृंगारिक हावभाव प्रथम असतात असे कवी सांगतो निर्विंध्या नदी ही एक मेघा वर प्रेम करणारी नायीका आहे. कालिदासाने अचेतनात ही शृंगार खेळवलेला दिसून येतो. तुझ्या विरहाने कृश झालेली ती नदी तू पाण्याचा वर्षाव करून तिची कृशता नष्ट कर. येथे निर्विंध्या नदीचे मेघा वरील प्रेमावस्थेचे वर्णन केले आहे. मला आनंद देणारा शिप्रा नदी वरून वाहणारा सुगंधित वारा गोड गोड बोलून स्त्रियांच्या प्रेम क्रिडा करतो. सुगंधित चंदन स्नानामुळे नदीचे पाणी सुगंधित झालेले आहे. त्या गंधवती वरून वाहणाऱ्या वाऱ्याद्वारे जेथील उद्यान हलविले जाते अशा त्रिलोक नाय महाकालेश्वर शंकराच्या पवित्र स्थानाला मंदिराला जा. या महाकालेश्वर च्या मंदिरात मोठे शिवलिंग आहे हे रघुवंशात ही आलेले आहेत.

संध्याकाळच्या पुजेच्या समयी वाजविल्या जाणाऱ्या नगार्या प्रमाणे गंभीर गर्जना केल्यास तुला फार मोठे पुण्य लाभेल. गंभीरा नदीचे जलरुपी वस्त्र धरून थांबलेला तुझे प्रयान इथून मोठ्या कष्टाने होईल कारण स्त्री सहवासाचा तरी सर्व अनुभव घेतलेला कोणता पुरूष अनावृत्त स्त्री चा त्याग करण्यास समर्थ होईल. गंभीरा नदीवर नायीकेचा तर मेघावर नायकाची उपमा स्पष्ट होते. देवगिरी पर्वतावरच निवास कर देवगिरी पर्वत आधुनिक देवगढ येथे कार्तिकेयाचे मंदिर आहे. ते तुझ्या खाली वास्तव्य करेल. तुला सोबत राहून तुझी सेवा करेल. यानंतर दशपुरातूनच ब्रम्हावर्त देशाच्या कुरूक्षेत्रामध्ये पोहोचणर सरस्वतीच्या पाणी पिल्यानंतर आंतरिक शुध्दी होणर त्यानंतर हिमालयाला गंगा नदी मिळणार आणि त्या गंगेच्या नदीमध्ये तुझी सावली पळताच असे जाणवेल की जणू काही प्रयागाच्या अतिरिक्त यमुनेचा येथे संगम झाला की काय तिथून निघाल्यावर हिमालय पर्वताच्या शोभेचे निरीक्षण करत तो पर्वताच्या शदापासून कैलास पनवून शिखरावर हराण्यास योग्य होशील. मानस सरोवराचे पाणी पिल्यानंतर तू समोर जाशील त्यानंतर अलकापूरीचे चित्रण कवीने केले आहे. आपल्या घराचे वर्णन करताना सागतो की माझी प्रियतमा ओळखण्यासाठी तिच्या स्वरुपाचे वर्णन केले शेवटी आश्वासन देण्यासाठी आपल्या कुशल आणि व दुःख समाचार मेघाला सांगतो आणि प्रार्थना करतो की संदेशाचे उत्तर घेऊन परत ये.

अशाप्रकारे महाकवी कालिदासाने प्रकृतीने त्यादृष्टीने कवी आणि प्रकृती मध्ये दिसून येते. चातकपक्षी आपल्या पंखाने मेघाची सेवा करतात. माणूससरोवरात जाणारे आपल्या मृणाल चोचीत धेऊन मेधाची यात्रा करतात. त्यानंतर शेतीचेपाणी पिऊन आपले अंतःकरण शुध्द होणार आहे. बाहेर मात्र काळे असणारे त्यामध्ये मेघाची अंतर्गत शुध्द व अशुध्दीचे ज्ञान कालिदासालाअसल्याचे दिसून येते. मेध हिमालयाची दावाग्नी विजवितो. त्रिपुर विजय गीतामध्ये आपल्या गर्जनेने मृदंग ध्वनीची योजना करतो.

स्कंदाची पूजा केली जाते. गंगेचे पाणी पिऊन घरी गायीचे शेपुट जळण्यापासून वाचवितो. प्रकृतीच्या सौंदर्य शालिनी समृध्दीची रमणीयतेचे वर्णन दिसून येते. दशार्ण देशांमध्ये उपवनाच्या कुंपनावर केवडयाचे फुलं लदलदून दिसतेवनात काळे जांभुळ पिकलेले आहे. काही ठिकाणी हंस आषाढात थांबलेले दिसतात. कालिदासाच्या या काव्यामध्ये हिमालयाचा परीसर अतिशय पवित्र चित्रित केलेला आहे. कुमारसम्भवम्मध्ये हिमालयाच्यावर्णनामध्ये शृंगाराची उद्दाम प्रवृत्ती दिसून येते. गंगा नदी आहे जी स्वर्गालाजाण्यासाठी पायऱ्याच्या रुपाने काम करते. कैलास पर्वताचे उज्ज्वल उंच उंच शिखर आकाशाप्रमाणे उंच आहे. शिवाच्या प्रति दिवसाच्या अट्टाहासाचे पुंजीभूत स्वरुपासारखे दिसते. कवीची अलका नगरी शिवाच्या भालतिलक चंद्रिके सारखी चमकते ओ. पिकलेले फळांनी लदलदलेलाआम्रकूट पर्वत पिवळा झालेला आहे. त्याच्या शिखरावर मेघ कोमल केसांच्या जुड्यासारखा काळा झालेला विराजतोयाच कल्पनेचा विलास मेघदूतात व्यज्जनेद्वारे प्रस्फुटीत आहे. मानवीकरणाचे अप्रतिम शक्तीचे प्रदर्शन या काव्यात दिसून येते.

महाकवी कालिदास विरचीत खंडकाव्य प्रकृतीचे अप्रतिम सुंदर वर्णन केले आहे. प्रत्येक पर्वतावर मयूर तुझे मधून गीताने स्वागत करीत प्रसादाचा आनंद नक्की घेते आणि त्या वेळी आपल्या हातून एखादी रात्र विषय गंभीर मंद मंद पावले घराकडे जात कालीदासांच्या रचनांचा आधार आणि प्रयोजन काही ठिकाणी प्रकरणांमध्ये सांगितले आहे. कालिदासाच्या रचनावर वैदिक साहित्य, रामायण, महाभारत आणि पुराणांचा प्रभाव दिसून येतो. कालिदासाने आपल्या पूर्ववर्ती वाल्मिकी भास सौमि कवींच्या प्रति आपला आदर भावर प्रकट करीत त्यांच्या पथ मार्गावर काव्यरचना करणे स्वतः स्वीकार केले आहे. कालिदासाने भौगोलिक वर्णन, सामाजिक चित्रण, लोकमान्यता, धार्मिक, सांप्रदायिक विचार आणि वर्णन कलाविलासिता, वास्तुकला, चित्रकला, गोष्टी, मनोविनोद इत्यादी सामाजिक चित्रण केले आहे. तसेच पती व पत्नीचा विरह काळातील व्यवहाराचे चित्रण केले आहे. अशा प्रकारे महाकवी कालिदासाने निसर्गावर पती पत्नीच्या व्यवहाराचे वर्णन केलेले आहे.

संदर्भ :-

१) मेघदूत - कालिदास
२) संस्कृत साहित्य व आलोचनात्मक इतिहास- रामजी उपाध्याय
३) मेघदूत की प्रमुख टीकाओ का तुलनात्मक अध्ययन - डॉ. हुमकुम जिन्दाल
४) संस्कृत साहित्य का आलोचनात्मक इतिहास - रामजी उपाध्याय.
५) संस्कृत साहित्य की रुपरेखा - स्व. पं. चंद्रशेखर पाण्डेय, एम. ए. शास्त्री, डॉ. शान्तीकुमार नानूराम व्यास